अतिरिक्त कार्यभार सोपविताना विचारात
घ्यावयाच्या मार्गदर्शक सूचना...

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः अतिका-२४१९/प्र.क्र.१०६/सेवा-२**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: १४ मे, २०१९

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ५६ नुसार जेव्हा एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याकडे त्याच्या स्वत:च्या पदाव्यतिरिक्त दुसऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो, तेव्हा अशा दुसऱ्या पदाकरिता त्यास अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्यात येते. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-१ मधील अनुक्रमांक १४ अन्वये अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकारी प्रत्यायोजित करण्यता आले आहेत. त्याअनुषंगाने वित्त विभागाने, विविध शासन निर्णयान्वये अतिरिक्त कार्यभार मंजूर करण्याच्या अधिकारितेसंदर्भात तसेच अतिरिक्त वेतन/विशेष वेतनाच्या दरासंदर्भात वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत.

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ मधील अधिकाऱ्यांना क्षेत्रिय स्तरावर/संचालनालय स्तरावर अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो. त्यामुळे त्यामध्ये सुसूत्रता राहत नाही. त्या दृष्टीने महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६००) मधील अधिकाऱ्यांना आरोग्य सेवा संचालनालय स्तरावरुन अतिरिक्त कार्यभार देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६०० पेक्षा अधिक) मधील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यासंबंधीची प्रकरणे शासनास सादर करण्यात यावीत.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ५६ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांकडे त्यांच्या स्वत:च्या पदाव्यतिरिक्त दुसऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो. असा हा दुसऱ्या रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार पदाचा, एकाच प्रशासकीय विभागांतर्गत, प्रशासकीय सोय व निकड लक्षात घेवून शक्यतो त्याच कार्यालयातील, त्याच संवर्गातील सर्वात सेवाजेष्ठ,अनुभवी व कार्यक्षम अधिकारी/कर्मचाऱ्यास सोपविण्यात यावा. जेथे असे अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसतील तेथे संबंधीत पदाला लगत असलेल्या निम्न संवर्गातील सर्वात ज्येष्ठ अधिकारी/कर्मचारी यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात यावा.

४. अतिरिक्त कार्यभार दिलेला अधिकारी/कर्मचारी त्याच्या मुळ पदाच्या कर्तव्य व जबाबदारीसह त्याच्यावर अतिरिक्त कार्यभार सोपवलेल्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडू शकेल याची संबंधितांनी खातरजमा करावी.

५. विभागीय चौकशी सुरु असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यास अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे त्याच्या स्वत:च्या विभागीय चौकशीवर प्रभाव पडण्याची वा विभागीय चौकशीमध्ये अडथळा आणण्याची शक्यता असल्यामुळे अशा अधिकारी/कर्मचाऱ्याना अतिरिक्त कार्यभार देण्यात येऊ नये.

६. दोन वर्षापुढे अतिरिक्त कार्यभार सुरु ठेवावयाचा असेल अशा प्रकरणी दोन वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाची पुर्वानुमती घेणे आवश्यक आहे. पूर्वपरवानगी न घेता अतिरिक्त कार्यभाराची व्यवस्था दोन वर्षापेक्षा अधिक काळ चालू राहील्यास कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

७. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६००) मधील अधिकाऱ्यांना आरोग्य सेवा संचालनालय स्तरावरुन अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या अधिकाऱ्यांचा तपशिल वेळोवेळी शासनास सादर करण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१४१०५३१९९२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tatoba Maruti Kolekar

Digitally signed by Tatoba Maruti Kolekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f6809ddecc0e0507860e37e9935ab3a7013510f4fe04fad27512588a0bc8e15f, cn=Tatoba Maruti Kolekar
Date: 2019.05.14 11:34:03 +05'30'

**( ता. मा. कोळेकर )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा (२), पुणे
४. सर्व अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
५. सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा
६. निवडनस्ती सेवा-२